# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Marathi

## Assignment

## Session: 2020 – 2021

PAGE :
DATE : / /

SEAL

नाव : कु. पूनम किशनकुमार पाचे

वर्ग : बी. ए. V सेम.

विषय : मराठी 'स्वाध्याय'

कॉलेज : यशोदा गर्ल्स आर्ट ॲण्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर

मार्गदर्शक : श्री. रावळकर सर.

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

SEAL

दिर्घोत्तरी प्रश्न :

1) विनोबा भावे यांनी आपण युग घडविणारे शिल्पकार आहोत, हे कसे स्पष्ट केले आहे ?

किंवा

आपण युगाचे उद्गाते आहोत, हे स्पष्ट करतांना कोणकोणते दृष्टांत विनोबा भावे यांनी सांगितले आहे ?

उत्तर :- विनोबा भावे हे थोर गांधीवादी आचार्य व भूदान चळवळीचे प्रवर्तक. धर्मनिष्ठा हे त्यांच्या जीवनाचे महत्त्वाचे व्रत होते. महान देशभक्त, गोरगरीबांचे कैवारी, सत्य, अहिंसा व न्याय इत्यादी मूल्यांच्या कटाक्षाने पालन करणारे असे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू आहे.

सृष्टीचे दातृत्व असमर्याद आहे. सृष्टी आपल्याला सातत्याने देण्याचे कार्य करते. दातृत्व हा तिचा धर्म आहे. सृष्टीपासून दातृत्वाने संस्कार घेऊन आपणही आपल्या जवळचे इतरांना देत जावे. त्यामुळे सर्वांनाच सर्व गोष्टी प्राप्त होतील व परस्परांमध्ये बंधुभाव निर्माण होईल. परिणामी नव युग निर्माण होईल असा मौलिक संदेश विनोबा भावे यांनी दिला आहे.

आपल्या चहूबाजूला अनंत सृष्टी पसरलेली असून मानव हा त्यातील एक तुच्छ जीव आहे. ही सभोवताली असणारी सृष्टी

आपल्याला सदैव कोणीना काही देतच असते.
सूर्य रोज सकाळी उगवतो व आपल्या सर्व किरणांनी तो या पृथ्वीला दिपवून टाकतो. तो आपल्या घरात अशाप्रकारे आत शिरतो जणू मालकाच्या घरात सेवक तो फार मर्यादाशील आहे. जर आपण दार उघडले नाही तर तो काय आपल्या दाराला धक्का देऊन उघडत नाही. उलट मालक हे दार केव्हा उघडेल व मी केव्हा त्यांच्या सेवेसाठी आत जाईन अशी वाट पाहत असतो. आपण अर्धेच दार उघडले तरी तो दारातून डोकावून आत येतो. आपल्यासारख्या स्वार्थी लोकांसाठी तो आजीवन सेवा प्रदान करतो.

वायू निरंतर आपल्या सभोवताली असते. तो कोठून येते व कोठे जाते हे आपल्याला माहित नसेल. प्राचीन काळात असा समज होता की, एक वायू हिमालयाकडून व एक वायू समुद्राकडून आपणास मिळते व आपल्याला स्पर्श करून श्वासोच्छवास देते. आपल्यावर आनंदाचा वर्षाव करते आपले तुच्छ जीवन पूर्ण करण्यासाठी तो निरंतर झटत काम करतो. समजा त्याने हे कार्य सोडले तर आपण संपून जाऊ.

पहाडा-पहाडांतून वाहणारी ही गंगा नदी आपल्या सेवेसाठी आहे. जे झाड आपण लावतो त्यांचे ती सदैव पोषण करते. आपण जर आंब्याचे झाड लावले तर आंबाच मिळेल आणि बाभळीचे झाड लावले तर बाभूळ मिळेल, काय पाहिजे ते आपल्याला ठरवायचे आहे. आपली इच्छा पूर्ण करणे हेच गंगामातेचे काम आहे. शिवाय हे मेघ आपल्यावर सदैव मेघधारांचा वर्षाव करीत असतात. त्या मोबदल्यात ते आपल्याकडून कुठलीही रक्कम आकारत नाही तर आपल्याला सदैव आनंद देत असतात.

सृष्टी ही करुणामय आहे, दानी आहे. ही सदैव आपल्या दानाचे (देण्याचे) काम करते. फळे फळतात, फुलतात आम्ही त्यांना पाणी घातले तर ते फळतात, न घातले तर दुःखात होतात. पण फळे देतांना ते कुठलाही भेदभाव ठेवत नाही. आपल्या क्षमतेप्रमाणात फळे देतच राहतात. त्यांच्या सावलीखाली बसून त्यांच्याच शाखा आपण तोडू लागलो तर कसे होईल, तरी ते आपल्याला काहीही बोलत नाही.

हेच शिक्षण आपल्या आईने आपल्याला दिले. तिने आपल्याला दानाचे शिक्षण दिले आहे. आपण जेव्हा लहान होतो तेव्हा पण आपली जन्मतः च तिचे स्तन भरून गेले. व तिने

आपल्याला दूध पाजले. दूध पिण्याची वेळही लक्षात आपल्याला होती त्यापेक्षा अधिक आपल्या आईला आपल्याला ते पाजण्यात होती. देत राहावे. ही शिकवण तिने आपल्याला लहानपणापासून शिकवली. तर सृष्टीदेखील आपल्याला देत राहावे हे ज्ञान देते. आपण सर्व फक्त घेऊन इच्छुक व देण्याची इच्छाच राहणार नाही तर काय होईल? कारण घेण्याचे काम हे देण्यावरच अवलंबून आहे. आपले काम सृष्टीशी सुसंगत होण्याचे आहे. आज जे चालले आहे. हे अत्यंत कृत्रिम व सृष्टीशी विपरीत आहे. तरी पण लोक फक्त घेण्याचा अभ्यास चालत असतो.

वस्तुत: परिस्थिती वेगळी आहे.

या परिस्थितीमुळे आम्ही स्वार्थी बनलो आहोत. पण कुटुंबात पाहिले तर ज्याला आम्ही स्वार्थी म्हणतो तो काय करीत असतो. त्याने घरात प्रवेश केल्याबरोबर तो आपल्या मुलावर किती प्रेम करतो. मुलांची भूक आईबाबांना लागते. ते मुलांना देण्यासाठी आतुर असतात. ते म्हणतात की, "मुलांसाठी, भावा-बहिणींसाठी, आई-बापांसाठी आपण जेव्हा काही करतो त्या वेळी आम्हाला अत्यंत आनंद होतो. (महाराज)

उपनिषदांनी सृष्टीचा आनंद व्यक्त केला आहे. ही सृष्टी आनंदातून निर्माण होते आणि आनंदातच लय पावते. आजसुद्धा प्रत्येकाला काही ना काही आनंद प्राप्त होत असतो. लोक सांगतात सुखाच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करावयास पाहिजे. पण सुखासाठी प्रयत्न करण्यापेक्षा दुःखासाठी प्रयत्न केले पाहिजे. सुख मिळविणे हेच तुमचे स्वरूप आहे. एखादा साखरेचा खडा तोंडात टाकल्याने सुख निर्माण होत नाही. तर ती चैतन्यरूप आपल्या सुखात आहे ती सुख निर्माण करते. आपण स्वतः आनंद स्वरूप असल्यामुळे त्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करण्याची गरज नाही. मनुष्य हा आनंदमय आहे. त्याने आनंदाच्या प्राप्तीसाठी नाही तर शुद्धीसाठी तुम्हासाठी प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येक मानवाची प्रवृत्ती व स्वभाव ही वेगवेगळी असते. त्यानुसार त्याचे वर्तन असते. कोणाला दारू पिण्यात आनंद वाटतो. तर कोणाला अभ्यास करण्यात. कोणाला दान देण्यात व कोणाला सेवा करण्यात असा आनंद हा निरनिराळ्या प्रकारचा

रूपात आजही येथे शिल्लक प्रत्येक मानवाच्या
हृदयात त्यांच्या स्फूर्तीचा अंश असल्याने
आहे. अडीच हजार वर्षांपूर्वी ते करुणेवर
लोकांना ज्ञान-दान देत संचार करीत
आहे. मी सुद्धा एक बुद्ध व्यक्ती त्यांच्या
पावलांवर पाऊल टाकण्याचा प्रयत्न करीत
आहे. श्रावस्ती कथा लोकांची वृत्ती
दर्शविते. लोकांनी एकदा भगवान बुद्धांना
चातुर्मास पाळण्यासाठी श्रावस्तीला बोलविले
गावकऱ्यांनी जमीनदाराकडून बुद्धांसाठी
शांत व एकांत अशी जमीन मागितली,
पण जमीनमालकांनी जमिनीवर ठेवलेल्या
मोला संख्या जातील तितक्या किमतीला
जमीन देण्याचे कबूल केले. ही बुद्ध
काळातील घटना आहे. पण त्याच
श्रावस्तीत माणसासारख्या तुच्छ माणसाला
त्याची बुद्धाच्या तुलनेत काहीच किंमत
नाही, शंभर एकर जमीन मिळाली, मग
हे सत्ययुग की कलियुग हा प्रश्न पडतो.
त्याचा विचार करणे गरजेचे आहे.

PAGE :
DATE : /

१. किडलेली माणसं या पाठाच्या आधारे चाळीतील व्यक्तिच्या हासळलेल्या नीतिमत्तेचे आणि मानसिकतेचे वर्णन करा ?

किंवा

किडलेली माणस पाठाच्या आधारे मनुष्याच्या विविध स्वभाव वृत्तीचे दर्शन लेखकाने कसे वर्णन केले आहे ते स्पष्ट करा ?

प्रस्तुत पाठात लेखक गंगाधर गोपाळ गाडगीळ यांनी माणसांच्या विविध रोमहर्षक पैलूंना वाणलेले आहे. काळानुरुप व समाजातील वर्णद्वेष व जातीय भेदामुळे माणसाची प्रवृत्ती कशी बदलते हे त्यांनी विनोदी लेखनातून अतिशय प्रत्ययपूर्ण स्पष्ट केले आहे. आधुनिक युगात माणसे व त्यांची प्रवृत्ती कशी स्वार्थी बनत चालली आहे हे त्यांनी स्पष्ट केले आहे. मानवाची वृत्ती किती संकुचित बनली आहे हे ते स्पष्ट करतात व आपल्या कृतीतून ते एकमेकांना आपली कशी नुसत्यापेक्षा वेगळे आहोत हे ते स्पष्ट करण्याचा प्रयत्न ते करतात.

प्रस्तुत कथेतून चाळीकरी कनिष्ठ मध्यमवर्गीय समाजगटाचे दंभस्फोटात्मक चित्रण आले आहे. मुंबईतील चाळीत

दंगलीसारख्या गंभीर व गुंतागुंतीच्या घटितांच्या पार्श्वभूमीवर या मानसांचे खरा आविष्कार नेमकेपणाने व तिव्रतेने येथे प्रतीत केलेले आहे.

पेठवाडीतील खटमुट्यांची चाळ म्हणजे ~~महाराष्ट्रीय~~ महाराष्ट्रातील मध्यमवर्गीय संस्कृतीचा सुपीक मळा होता. अशा ह्या खटमुट्यांच्या चाळीतील दुसऱ्या मजल्या-वर जरी बरीच धामधूम असली तरी पण नटव्या मालतीबाई आपल्या पावडर नवऱ्यावर खेकसत होत्या त स्वस्थ सेठ येत होते. शेजारच्या खोलीत घारुअण्णांचा पट्ट्यांचा अड्डा मोठ्यामोठ्याने खिदळत होता. तर तिरपे बंडोपंत आपल्या खिडकीशी उभे राहून आपण समोरच्या चाळीतील एका सुंदर बाईकडे पाहत नाही असे दाखविण्याचा प्रयत्न करीत होते. तर श्यामराव दलाल बसून जुन्या छत्रीची ठाकठीक करीत होते तर काटकुळे अप्पाराव सोनापूरे हिंदू महासभेच्या राजकारणावर आपल्या किरट्या आवाजात चर्चा करीत होते.

दूर उडाले आणि विसकटलेल्या, लोंबकळलेल्या डोळ्यांच्या रोकट साहाय्याने आपल्या काठीच्या फटक्यासरशी खळकन सगळ्या काचा फोडल्या.

~~सारे नळ~~ त्या आवाजासरशी सारे बघे लोक कुतूहल व भीतीची आणि कायद्याला दुबळ्या आनंदाची विविध सगळ्यांच्या शरीरातून गेली. ते दृश्य पहायला सकाळी शेकडो लोक हजर झाले होते. प्रत्येक इमारतीतून डोक्यांच्या रांगा दुराकडे उत्कंठतेने पाहत होत्या आणि भीतीमुळे जणू एखादा रिकामा झाला होता तरी त्यांच्या दोन्ही डोळ्यांना माणसांच्या झुंडी लावून त्या दुराकडे बघत होत्या. मात्र कोणीही त्या मवाल्यांना थांबवण्यासाठी पुढे सरकत नव्हते. ते दृश्य पाहताच दामू विलक्षण आनंदाने ओरडला " अरे, अरे, ते पहा मवाली दुकान फोडतायत" त्याबरोबरच कुटुंबीयांच्या चालीतील दुसऱ्या मजल्यावर एकच धावपळ झाली जणू ती ऐतिहासिक घटना होती आणि ती स्वतःच्या वाडीसमोर घडत असताना ती घटना न पाहणे म्हणजे आयुष्यातील फार मोठ्या आनंदाला मुकण्यासारखे होते.

शिकून हे इतके चांगले दिसेल ती जागा मिळवि-
ण्यासाठी मुलांत ढकलाढकली आणि मारामारी
सुरू झाली आणि अशोकच्या हालअपेष्टांच्या
ओढणारे मुलांनी त्या पोरांना त्या जागेवरून
आधीच हुसकावले. तर माधवरावांच्या दोन
वर्षांच्या शामला बघीने धाडदिशी मागावर
आपटले. तेवढ्यात हाकालवला लकडम आपल्या
मुलांवर ओरडले. दामू मात्र तिथेच उभा
राहिला. कारण ही बातमी त्यालाच पुरविल्यामुळे
विशेष अधिकार आपल्याला मिळाला आहे असे
त्याला वाटू लागले. तेवढ्यात दयाभावाने
शामराव म्हणाले, अरे, अरे काय विचारतो त्या
नुकसान करताहेत. तेवढ्यात सेनापूर किल्ल्या
आवारात किंचाळले, हल्ल चुकते तुमचे,
ह्या मुसक्यांना काय म्हणून दया दाखवायची,
ते आमच्या बायका पळवतात, पोरं
बाटवतात देवळं भ्रष्ट करतात तेव्हा? काही
नाही. त्यांना असाच दंड दाखवला पाहिजे.
आपल्या राजकीय मताशी सेनापुरेंना
शामरावांना बोलून सोडण्यात फार आनंद
होई.

तर नटव्या मालतीबाई ते
दृश्य पहायला लगबगीने बाहेर
आल्या होत्या. पण ह्या गर्दीत
धक्काबुक्की करीत कठड्याजवळ येणे
त्यांच्या प्रतिष्ठेला शोभणारे होते.
सौंदर्य आणि ओसरलेले आयुष्य इतरांपेक्षा
अधिक आहेत हे त्या वेळोवेळी आपल्या
कृत्यातून सिद्ध करीत असे. तरुणात
बडोपंत बावळटपणे चालत आणि चटकन
त्यांना धक्का देऊन पुढे गेले. मालती
बाईंना माहित होते हे त्यांनी मुद्दाम केले.
म्हणून बडोपंताविषयी नेहमीच त्यांच्या
मनात संताप आणि तिरस्कार असे.
बडोपंतांचे डोके ओकच्या वाटीसारखे
टेचाव डलका त्यांना तोच वाटला.
पण तरी त्या आवरून धरल्या.
त्यांचे मन तयार होईना. स्वस्थावरून
ऐलावलात, बायकांना धक्के देण्याची
सवय बडोपंतांना होती. ह्या बाबतीत
त्यांचे धूर्त सूक्ष्म आणि निर्लज्जपणाने
वेळ चालत असे की त्यांना स्वतःचीच
किळस वाटू लागे. पण त्या क्रूर
सवयीमुळे त्यांचे कधी चालत नसे
सवरण्यातच नेहमी बंद असणारे त्या

होती. खोडव्याच्या खोलीचे दार उघडले आणि
मनोहर-लीला बाहेर आली. आपण या चाळीतील
लोकांपेक्षा आधुनिक, नीटनेटके व स्वच्छ आहोत
हे दाखविण्याकरिता ते दोघे असे वागत.
गॅलरीतील दरवाजे थोडे मूल दिसले की, लीला
एकदम "ईऽऽ" म्हणून किंचाळायची. त्यांना
तेथून खाली काय चालले आहे ते दिसेना
म्हणून मनोहर खुर्चीवर उभा राहिला. तेव्हा
त्याने लीलालाही आपल्यासोबत खुर्चीवर
उभे राहण्यास सांगितले. लीला खुर्चीवर
उभी राहताच सर्व खाली फोडलेल्या दुकानाकडची
त्या दोघांकडे माना वळवून पाहू लागले. तेव्हा
लीला फणकारली, "चला मेले!" आणि
मग ते दोघे घरात जाऊन परत दार बंद केले.
तेव्हा सोडअण्णा म्हणाले, दुकानाशिवाय कोणी
मवाली या लोकांचे घोबाड का फोडत नाही
त्यांच्यासारखी रुपये आणि लाकडांची
दागिने कुठल्या कुणाला नव्हती, शिवाय
त्यांच्याबद्दल सर्वांनाही कोणाला राग येत
नव्हता.

दामू त्या दुकानाच्या अगदी जवळ
जाऊन उभा राहिला. त्याला या गोष्टीचा विलक्षण
अभिमान वाटत होता. तो इतर दूर उभे असलेल्या
लोकांकडे तिरस्काराने पाहू लागला. तेवढ्यात

एका भैयाने त्या बुटांच्या रांगेतले
चांगलेसे बूट आपल्या पायात चढवले
आणि दोन चार बुटांच्या जोड्या
कोटीस मारून तो हसत पुढे निघून गेला.
भैयाच्या त्या कृतीतून हळूहळू सर्वांना
धीर मिळाला. आपोआपच पुढे सरकणाऱ्या
वेणीवाल्याने देखील घाबरत-घाबरत
त्याचे अनुकरण केले त्यानंतर हळूहळू
मागचे लोक पुढे सरकू लागले. ही
धावपळ पाहून सेनापुरेदाखील पुढे सरकले
त्यावेळी धारूअण्णा म्हणाले, काय
सेनापुरे, तुम्ही पण निघाले?
त्याचवेळेस सेनापुरेना जाणीव झाली
आपण काय करत आहोत. इतक्यात
धारूअण्णाचा दामू दडदडत आला व
त्याच्या हातात एक बुटाचा जोड होता
तो म्हणाला, 'अण्णा-अण्णा हे पाहा मी
बूट आणलेत.' प्रसंगावधान राखून
धारूअण्णा म्हणाले दुसऱ्याच्या वस्तू
आपण उचलायच्या नसतात. पण आज
हे बूट आणले. नाही तर परत गर्दीत
सापडतील ते पाहून राधाबाईंना फार हेवा
वाटला. दामू इतक्याच वयाच्या मुली त्या
बोटांनी डिवचीत हसू लागल्या.

“जरा खाली वाकून ये बा. तो दामू पहा कसा हुशार आहे ?”

पण नाजूक मनाच्या मधूला ती कल्पना मानवण्यासारखी नव्हती. त्यामुळे तो कंटाळून दूर जाऊन बसला. दामू खाली गेला तेव्हा कुठलूद रान रंगात आली होती. या दंगलीतदेखील दामूने शिताफीने आपली पिशवी भरली आणि तो परत येऊ लागला. इतक्यात दांडग्या मवाल्याने त्याच्या हातातील पिशवी हिसकून घेतली आणि तो निघून जाऊ लागला. “हे काय? हे काय?” दामू ओरडू लागला. ते ऐकून मवाली मागे फिरला व त्याने दामूच्या थोबाडीत हाणली. त्याच्या डोळ्यातून पाणी आले आणि त्याचे डोके गरगरू लागले.

पोलीस येत असल्याची बातमी कळताच लोक सैरावैरा पळू लागले. मवाली गुप्त झाले तर पिशवी हरवल्याबद्दल घाबरलेल्या, त्यांच्यावर ओरडले आणि सोबत दोन-चार बायका आणि बरोबरची मुले घेऊन जाणारा एक कारकून धावून त्या सर्वांपुढे धावत आणि मागे न बघता ओरडत होता, “अरे अरे चोराने पळा पाय मोडले की काय तुमचे ?”

अशाप्रकारे विनोदी व हास्यास्पद वर्णन लेखकांनी केलेले आहे.

SEAL

३) संत तुकारामांच्या अभंगवाणीचा आशय सविस्तर स्पष्ट करा.

किंवा

संत तुकारामांनी संतांची कोणती ओळख आपल्या अभंगवाणीतून केली आहे?

→ संत तुकारामांच्या अभंगवाणीचा आशय आपल्याला पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल

जे का रंजले गांजले।
त्यासी म्हणे जो आपुले. ॥१॥
तोचि साधु ओळखावा।
देव तेथेचि जाणावा ॥२॥

संत तुकारामांच्या मते खरा संत हा जे दुःखी, पीडीत ज्यांच्यावर अन्याय झाला आहे अशा लोकांना आपले म्हणतात आणि केवळ होत असतात. तसेच त्यांच्यावर प्रेमाचा हात फिरवितात. त्यांना आधार देतात आणि त्यांची पिडा, अन्याय दूर करण्यासाठी ते प्रयत्न करीत असतात. अशा गरीब व पीडित लोकांच्या उद्धारासाठी संत हे कार्य करीत असतात. अशाप्रकारे कार्य करणाऱ्या व्यक्तीला आपण साधु म्हणावे आणि अशाच लोकांच्या अंगी

देवाचा अंतर्भाव असतो. असे संत तुकाराम महाराज यांनी सांगितले आहे.

मृदु सबाह्य नवनीत ।
तसे सज्जनाचे चित्त ॥३॥
ज्यासि अपंगिता नाही
त्यासी धरी जो ह्रदयी ॥४॥

संत तुकाराम महाराज म्हणतात की, जे व्यक्ती सदैव मृदुपणाने वागतात, कोणाचाही द्वेष करीत नाहीत, सदैव त्यांचे चित्त शांत असते. त्यांची वागणूक नेहमीच सज्जनासारखी असते, त्यांच्या वृत्तीत कोणताही दोष दिसून येत नाही. अशा व्यक्तीस आपण साधू म्हणावे. ज्यांचे या जगात कुणीच नाही. ज्यांना या जगात कुणीच आधार कुणीच नाही, ज्यांचा या जगात कुणीच नाही, ज्यांना या जगात कुणीच आधार नाही, ज्यांना या जगात कुणीच आधार नाही, आधारहीन असणाऱ्या जनांना जो आपल्या हृदयाशी कवटाळून धरतो अशा व्यक्तीस आपण साधू म्हणावे असे संत तुकाराम महाराज सांगतात.

PAGE :
DATE : / /

दया करणे जे पुत्रासी
तेचि दासा आणि दासी ॥५॥
तुका म्हणे सांगू किती
तेचि भगवंताची मूर्ती ॥६॥

संत तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणे पिता हा पुत्रास दया करतो, त्याप्रमाणे संत हे आपल्या आजूबाजूच्या जनतेवर दया करीत असतात आणि त्यांचा उद्धार करीत असतात. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, आपणही काय सांगावे आणि किती सांगावे असे वरील गुण ज्यांच्या अंगी असतात तो व्यक्ती भगवंताची मूर्तीच असते. त्याला भगवंत म्हणायला पाहिजे, असे संत तुकाराम महाराज म्हणतात.

न्हाउनिया तीर्थी काय तुवा केले।
चर्म प्रक्षाळिले वरी वरी ॥१॥
अंतरीचे शुद्ध कासयाने जाले।
भूषण ते केले आपणया ॥२॥
इंद्रावण फळ घोळिले साकरे।
भीतरील थोर मोडेचिना ॥३॥
तुका म्हणे नाही शांति क्षमा दया।
तोवरी कासया फुंदा तुम्ही ॥४॥

संत तुकाराम महाराज

म्हणतात की आपण पापक्षालन करण्यासाठी तीर्थाला जातो काय मिळविले फक्त तीर्थात जावून शरीर आणि बाह्य त्वचा धुवून काढण्याचेच काय केले. अंतरीचे म्हणजे अंतर्मनाचा मळ तो तसाच शिल्लक राहतो. फक्त आपण वरवर शरीराला स्वच्छ केल्याचे करण्याचेच कार्य केले. त्यामुळे अंतरीचे दुर्गुण हे तसेच राहिलेले आहेत. कारले बाहेरून कडू आणले आणि ते वरवर साखरेत घोळले तरीसुद्धा त्या फळावर आतमधील आतील कोणताच बदल होणार नाही व त्याला साखरेचा मधुरपणा प्राप्त होणार नाही. म्हणून संत तुकाराम महाराज म्हणतात की जोपर्यंत तुमच्या अंगी शांति, क्षमा, दया येणार नाही तोपर्यंत तुम्हाला तुमच्या अंतर्मनाला कुठलेही मिळवता येणार नाही व दोष दूर करता येणार नाही.

गंगा-जळा पाही पाठी पोट नाही।
अव-गुण तो काही अमृताशी ॥१॥
रवि दीप काळिमा काय जाणे तम।
माणिका निमित्य माग लेणे ॥२॥
कर्पूर-कांडणी काय कोंडा कणी।
सिंधू मिळवणी काय चाले ॥३॥
पारिस चिंतामणी आणि कोण्हा गुणी
चालते लागोनी नव्हे तैसा ॥४॥
तुका म्हणे तैसे जाणा संत-जन।
सर्वत्र संपूर्ण गगन जैसे ॥५॥

संत तुकाराम महाराज म्हणतात, गंगेत जरी आपण आपले प्रतिबिंब पाहिले तरी त्यात पाठ आणि पोट हा वाईट भाग दिसत नाही. त्याप्रमाणे चांगले-वाईट, गुण-अवगुण, पापी-पुण्यवान यांचा फरक अमृताला कळत नाही. अमृताचा गुण अमरत्व प्राप्त करून देणे असतो. अमृत हे कधीच आपल्याला कोणताच फरक करीत नाही. तसेच सूर्य आणि दीप यांना अंधार आणि काळोखाचा अनुभव असतो, कारण त्यांच्यामुळेच अंधार दूर होत असतो. मात्र या अंधाराची जाणीव दिव्याला नसते. त्यामुळे त्याला अंधाराची

जाणीव तिच्याला नसते. त्यामुळे
त्याला अंधारात प्रकाश देण्याची
माहिती सुद्धा नसते. त्याचप्रमाणे
कुपे चाळताना तो किती उडतो
होतो याची जाणीव त्या कांडणीला
होत नाही.

समुद्राच्या नदीने सागरात
गोड मिळविण्याचा प्रयत्न केला तरी
तो असफल ठरेल. सागरावर त्याचा
काहीच परिणाम होणार नाही.
परिसाच्या गुणा हा शालिग्राम
महत्त्वाचा असतो. त्याच्या स्पर्शाने
लोखंडही सोने होते. मात्र परिस
डाळक्या बांधून ठेवला तर त्याचा
गुण कार्यक्षम नसतो. त्यामुळे
लोखंडही सोने होत नाही.

म्हणून संत तुकाराम
महाराज म्हणतात, संत-जन आपल्याही
जवळ असतात. ते गगनासारखे
समर्थीत असतात त्यांच्यात
कोणताच अवगुण नसतो. त्यांच्या
जीवनातून व त्यांच्या कृत्यातून ईश्वराचे
कल्याण हे सदैव होत असत. अशा संतांचे
महत्त्व भाळ्यास संत तुकाराम म्हणतात.

४) 'कळा ज्या लागल्या जीवा' या कवितेचा आशय सविस्तर स्पष्ट करा.

→ कवी भा. रा. तांबे यांनी आपल्या 'कळा ज्या लागल्या जीवा' या कवितेत प्रेम आणि परिस्थिती यांच्यात अडकलेल्या जीवाची घालमेल - सामान्य मानवी कमजोरी. हळहळ जीव यांची अवस्था स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी मनाला रडवणारी भाषा व भावनार्थ ओळी यांचा त्यांनी वापर केला आहे. त्यातही जगाची रीत कशी असते. आपल्या दुःखात जग आहे सुद्धा वाया घालवत नाही व शब्दांनीच आपले दुःख कमी करण्याचा देखावा करतात, कारण तुमच्या दुःखाशी त्यांचे काहीच देणेघेणे नसते असे कवी सांगतात.

प्रेम आणि परिस्थिती या दोन्हीत अडकलेल्या जीवाच्या जिवाची घालमेल त्यांनी प्रस्तुत कवितेत व्यक्त केली आहे. मानवाच्या आयुष्यात दुःख येत असतात. ते दुःख मनाला लागून जातात. पण हे दुःख इतरांना कळत नाही. ते ज्या व्यक्तीलाच कळत

असतात. ते दुःख दुसऱ्यांना
कळत नाही हे कवींना या
कवितेतून सांगितले आहे.

कवी म्हणतात, त्या
माणसाच्या जीवनात त्रास आहे,
दुःख आहे, यातना आहे, त्याचा
त्रास फक्त मलाच होत आहे.
तो त्रास इतर कोणीही समजत नाही.
फक्त त्या यातना डोळ्यातून कळू
शकतात. इतर कोणीही ते समजू
शकत नाही व इतरांना त्या यातनांशी
काय सोयरसुतक, ते माझ्या
यातना कशा समजतील ? आणि
मला आलेले दुःख, यातना, इतर
लोकांना कसा सांगू ? कशाला
सांगू ? असल्यामुळे दुःखामुळे माझे
हृदय पोळलेले आहे. त्यामुळे कोणी
माझ्या हृदयावर हात ठेवला तरी
माझे दुःख कधी कमी होणार नाही
माझे शल्य कमी होणार नाही.
समुद्रात चारही बाजूंनी पाणी
असते. मात्र पिण्यासाठी एक थेंबही
पाणी मिळत नाही. त्याचप्रमाणे
सर्वच लोक आपल्या दुःखाविषयी

बोलतात, पण समजून कोणीही घेत नाही. माझ्या यातना कोणालाही कळत नाही.

लोक मला फक्त समजावण्याचे कार्य करतात आणि हे लोक पाठीमागून बोलण्याचे कार्य करतात. त्यांचे कार्य नुसते नाटक करण्याचे असते. यातल्या काहीत लोक चमत्कार करतात त्यांच्या वाईट कार्यात टीका करतात. दुसऱ्याचे दुःख कमी करण्यासाठी ते फक्त शब्दांचा वापर करतात त्यांच्या डोळ्यातून अश्रूंचा एक थेंबही येत नाही. कारण ज्याचे दुःख त्यालाच कळत असते. त्यासाठी तसाच प्रसंग त्यांच्या आयुष्यात आल्याशिवाय त्यांना दुःख कळत नाही.

नदीला खूप मोठा पूर आल्यास ती नदी ओलांडण्यास पूलही नाही आणि होडी आणि नावही नाही. त्यासाठी आता काहीच उपाय नाही. मागून सुतांच्या झुंजी लागल्या आहेत आणि पुढे पाणी आहे. अशा स्थितीत काय करणार? अशा चारही बाजूनी आलेल्या संकटांच्या वेळी माणूस जीवन कसे जगणार?

ही नदी जे पार करून गेले
त्यांच्या कानावर येत आहेत. पण
या जगातील मोहाचे पाश मला
ओढत आहेत. त्या पाशांनी
मोहांनी मला बांधून ठेवले आहे. असे
कवी म्हणतात. त्यामुळे माझ्या
जीवाला ओढ लागली आहे. मला
माझे दुःख पचवावे लागत आहे.
माझ्या जीवाला मुक्तीची ओढ
आहे. आता हे दुःख सहन होत
नाही. त्यामुळे माझ्या काळजाचे
ठोके चुकायला लागले आहेत. हे
दुःख कसे दूर करावे हे मला
आता कळत नाही.

कवी म्हणतात, आता
देवा तूच मला सांग, मी पुढे जाऊ
की मागे जाऊ. मी काय करू देवा
तूच सांग. माझ्यावर जगातील
लोक कोणी खडे मारतो, कोणी
हसतो, कोणी नावे ठेवतो तर कोणी
माझा हेवा करतो. आता मी काय
करू मला कळत नाही? कारण
माझ्या डोळ्यातील दुःख थांबतो
त्रास हा कमी होत नाही. हे दुःख

असहनीय आहे. ते सहन करण्याची ताकद
माणसात नाही. जेव्हा आयुष्यात दुःख
अपेक्षित नसते. तेव्हाच ते अचानक दुःख
येत असते जेव्हा आपल्याला जाणीवही
नसते व आपण सामान्य जीवन जगत
असतो आणि आपण कधीच अशा दुःखाचा
विचार केलेला नसतो. तेच दुःख जीवनात
येत असते आणि आयुष्यात कितीही आपण
कुणाकडे साकडं घातलं ? देवाला ही पूर्ण
भावासह साकडं घातलं तरी ते दुःख टळत
नाही आणि शेवटी ते दुःख जीवनात येते
आणि वेड लावून जाते. शेवटी आयुष्यात
आपण केलेल्या गोष्टींचा व आठवला
न केलेल्या गोष्टींचा पश्चात्ताप.
उरलेला असतो. प्रत्येक क्षणाची
आठवण आणि त्या क्षणाला आपण
न्याय न दिल्याने फक्त आयुष्यात उरतो
तो पश्चात्ताप त्यामुळे जीवन जगणे
कठीण होऊन जाते. आणि यात फक्त
उरतो तो जीवनाशी संघर्ष आणि
यातना ~~प्रवास~~ त्रास आणि दुःख यांचा
सहवास. याप्रमाणे आपल्या जीवनाची
घडामोड व्यक्त केली आणि त्यातही

PAGE:
DATE: / /

जग फक्त स्वार्थी वृत्तीने वागत असतं आणि आपल्या दुःखाला सामना आपल्याला एकटे करावा लागतो. जग फक्त शब्द व्यक्त करते आणि अश्रू हे फक्त आपलेच वाहतात. जगातील लोकांच्या डोळ्यातून अश्रूंचा थेंबही वाहत नाही, असे कटु सत्य या कवितेतून व्यक्त केले जाते.

SEAL

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15